SYBA Marathi - II March 15
Sem IV

library NO3ADE

वेळ : २ १/२ तास गुण : ७५

प्र. १ "शूद्रातिशूद्रांची गुलामगिरीतून सुटका होण्यासाठी त्यांना शिक्षण देणे हाच उपाय आहे" 'वैचारिक गद्य' मधील निबंधांच्या आधारे स्पष्ट करा. (१५)

**<u>किंवा</u>**

"सामाजिक समता निर्माण झाली तरच शूद्रातिशूद्रांची आर्थिक उन्नती शक्य आहे." 'वैचारिक गद्य' च्या आधारे विशद करा.

प्र. २ "कार्यक्षम होण्याची संधी दिली तर स्त्रियाही स्वावलंबी होऊ शकतात" 'वैचारिक गद्य' च्या आधारे परामर्श घ्या. (१५)

**<u>किंवा</u>**

"उद्योगधंद्यातील अधोगतीची आणि शेतक-यांच्या निकृष्ट स्थितीची कारण मीमांसा." 'वैचारिक गद्य' मधील निबंधकारांनी कशी केली आहे? ते लिहा.

प्र. ३ " बुद्धिवादी विचारच बुवाबाजीच्या भस्मासुराला नष्ट करू शकतात." 'वैचारिक गद्य' च्या आधारे चर्चा करा. (१५)

**<u>किंवा</u>**

" हृदय आणि बुद्धी यांच्या एकरुपतेतून निर्माण होणारा विचार म्हणजे धर्म होय." 'वैचारिक गद्य' च्या आधारे स्पष्ट करा.

प्र. ४ टीपा लिहा (१५)

(अ) 'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' मधील विचार दर्शन

**<u>किंवा</u>**

(ब) 'सामाजिक समता' मधील न्यायतत्व

(क) 'स्त्रीविद्याभ्यासः शंकानिवारण' मधील तरुणाचे विचार

**<u>किंवा</u>**

(ड) 'सख्यत्वासाठी' मधील स्त्रीवादी जाणीव

(ट) 'मुंबई -१९९९' मधील विचार स्वातंत्र्य

**<u>किंवा</u>**

(ठ) 'बुवाबाजीचा भस्मासूर मधील बुवाबाजीचे मूळ

मागे पहा....

NO3ADE

प्र. ५ अ) कोणत्याही **पाच** प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (१०)

१) 'समतेचे तत्व आपण स्वीकारतो तेव्हा समाजाविषयीचा एक आदर्श आपण स्वीकारतो' असे कोणत्या निबंधकाराचे मत आहे?
२) 'स्त्री आहे म्हणूनच सर्व संसार चालतो' हे मत कुणी व्यक्त केले आहे?
३) 'मनुष्याला स्वतंत्रता असणे ही मोठी जरुरीची गोष्ट आहे' हा विचार कुणी मांडला?
४) 'विद्यामृताच्या लाभास मुकल्याने अस्पृश्यांचे मोठे नुकसान झाले आहे' असे कुणाचे मत आहे?
५) 'प्रत्येक माणूस एक दुहेरी व्यक्तित्व असते ' असे कुणाचे मत आहे?
६) 'समाजातील सर्व व्यक्ती स्वःताचे हित साधायला सारख्याच स्वतंत्र असल्या पाहिजेत ' हा विचार कुणी मांडला आहे?
७) 'समाजातील संपत्तीचे न्याय्य वाटप झाले पाहिजे' हा विचार कोणत्या निबंधात मांडला आहे?
८) 'पुराणात १८ वर्णांचा भेद लिहिला आहे' असा विचार कोणत्या निबंधात मांडला गेला आहे?

प्र. ५ ब) पुढील पर्यायांपैकी **योग्य** पर्याय निवडा (५ )

(१) 'आम्ही वारीक वारीक| करू हजामत बारीक' हा अभंग कुणी लिहिला आहे?
अ) सेना न्हावी (ब) नामदेव (क) बहिरा जातवेद

(२) 'रामाचे, रावणाचे राज्य गेले, पण जातीचे राज्य अद्याप चालतच आहे' असे कुणाला वाटते?
(अ) गोपाल बाबा वलंगकर (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (क) जोतीराव फुले

(३) 'स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन तिच्या विकासातील महत्वाचा घटक आहे' हा विचार कुणी मांडला?
(आ) शांता किर्लोस्कर (ब) दि. के. बेडेकर (क) मे. पुं. रेगे

(४) 'सख्यत्वासाठी' या निबंधाचे लेखक कोण?
(अ) शांता किर्लोस्कर (ब) वसंत बापट (क) दि. के. बेडेकर

(५) 'बुवाबाजीचा भस्मासुर' हा निबंध कुणी लिहिला आहे?
(अ) दि. के. बेडेकर (ब) मे. पुं. रेगे (क) श्री. म. माटे